नि.फौ.ख. क्रमांक.२१४/२०२४
सरकार विरुध्द माधव व इतर
निशाणी क्रमांक **२९ .**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०१**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की -
माझे नांव – वर्षाबाई भगवान कांबळे,
वय – ५० वर्षे, धंदा - घरकाम,
रा. धसवाडी, ता.अहमदपूर, जि.लातूर.

**शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती ए.एन. काकडे**
(फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २७३ अन्वये )

**०१.** मी आरोपींना ओळखते. आरोपी न्यायालयत हजर आहेत. घटना दि.१४-०४-२०२४ रोजी दुपारी २ वाजण्याच्या दरम्यान धसवाडी येथे माझ्या घरी झाली होती. घटनेच्या दिवशी मी व माझी सुन घरी असताना आरोपी माधव घरी आला तो मला त्याच्या पुतणीचे लग्न मोडल्याच्या कारणांवरुन शिवीगाळ करु लागला. त्यावेळी इतर आरोपी ही त्या ठिकाणी आले. आरोपी लक्ष्मीबाई, अम्रपाली व वैशाली यांनी मला केस पकडुन लाथा-बुक्यांनी मारहाण केली. आरोपी माधव याने ढकलत नेहुन दगडाने माझ्या डोक्यात मारले. त्यावेळी माझी सून सायली व विलास कांबळे यांनी सोडवा-सोडव केली. आरोपी अम्रपाली हीने माझी सून सायली हीला लाथा-बुक्याने व काठीने मारहाण केली. आमचे भांडण सोडविण्यास रंजित वाघमारे हे ही आले होते. घटनेनंतर मी किनगांव पोलीस ठाणे येथे गेले. पोलीसांनी मला उपचारा कामी सरकारी दवाखान्यात पाठविले. त्याठिकाणी मी दोन दिवस ॲडमीट होते. मला दवाखान्यातून सोडल्यानंतर मी घटनेची फिर्याद नोंदविली. आता मला फिर्याद दाखविली त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. फिर्यादीला **निशाणी क्र. ३०** देण्यात येते. ज्या दगडाने मला मारहाण केली. तो दगड मी ओळखू शकते. आता मला जप्त दगड दाखविला याच दगडाने मला मारहाण करण्यात आली होती. दगडाला **वस्तू-अ** असे संबोधण्यात येते. पोलीसांनी घटनास्थळावर येवून पंचनामा केला होता.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास – आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. एन.एन.देमगुंडे**

**०२.** हे म्हणणे खरे आहे की, सरजेराव हा माझा मुलगा व सुचिता ही त्यांची पत्नी आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरजेराव याने सुचिता हीला पळुन आणले होते. हे म्हणणे खरे आहे की, सुचिता आमच्या सोबत राहत नाही. तीने आमच्या विरुद्ध उदगिर येथे फौजदारी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी या केस साठी सुन सुचिता हीला मदत करत होते. साक्षीदार स्वत: हुन सांगतो की, त्याबाबत मला फारशी माहिती नाही. हे म्हणणे

खरे नाही की, सरजेराव याने पुन्हा दुस-या मुलीला पळुन आणलेले आहे.

**०३.** आरोपी यांचे मुळ गाव घटग्रा, ता. गंगाखेड हे आहे. दि. १४-०४-२०२४ रोजी आरोपींनी अंबेडकर जयंती निमित्त खिचडीचे जेवण ठेवले होते हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, या जेवणाच्या वेळी मी त्याठिकाणी जावून हे जेवण सांडून दिले. या घटनेबाबत आरोपींनी पोलीस ठाण्यात अर्ज दिल्याचे व त्याबाबत तहसिलदार यांच्याकडे प्रकरण दाखल झाल्याचे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी वर नमुद प्रकरण दाखल केल्यामुळे मी सदरची खोटी केस दाखल केली.

**०४.** हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराच्या पुर्वेला युवराज कांबळे याचे घर आहे. पश्चिमेला रस्ता आहे, दक्षिणेला मरेआईचे मंदिर आहे. हे म्हणणे खरे नाही की, रस्ता व मंदिर माझ्या घराजवळ असल्यामुळे त्याठिकाणी नेहमी लोकांची वर्दळ असते.

**०५.** आरोपी माधव याच्या पुतणीचे लग्न कधी जमले, कुठे दिले याबाबत मला माहिती नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, विलास सोपान कांबळे व रंजित वाघमारे यांच्यासोबत माझे कोणतीही दुश्मनी नाही. घटनेच्या वेळी किती लोक जमले होते हे मला माहिती नाही. या घटनेत मला तीन ठिकाणी जखमा झाल्या होत्या, माझ्या सुनेला दोन ठिकाणी जखमा झाल्या होत्या. माझ्या सुनेला डोक्यात व छातीला जखमा झाल्या होत्या. मी पोलीसांना माझ्या सुनेला आरोपींनी काठीने मारहाण केलेली सांगितलेले नव्हते.

**०६.** हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने गावातील ५ ते ६ लोकांविरुद्ध केसेस दाखल केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी कोणत्याही प्रकारे मारहाण केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या घरी आलेले नाहीत, त्यांनी शिवीगाळ केलेली नाही व मला केस पकडून लाथा-बुक्यांनी मारहाण केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनेनंतर दोन दिवस दवाखान्यात ॲडमीट होते हे मी खोटे सांगते. हे म्हणणे खरे नाही की, जप्त वस्तू-अ या दगडाने मारहाण केली होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

**फेरतपास** काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/-
**( आर.डी. वाबळे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
अहमदपूर.

दिनांक – १०.११.२०२५.